# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/U / 208 / 2009 / 42 /** **Date :-**

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance in respect Shri Anurag Chhaganlal Gaud, 13, Deogiri Colony, Anuragvatika Kranti Chowk Police Station Road, Aurangabad. **(Consumer no. 490011607907)**

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Anurag Chhaganlal Gaud, 13, Deogiri Colony, Anuragvatika, Kranti Chowk Police Station Road, Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 05.05.2009 **at 11=30 Hrs.**

Encl: As above

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad.

**Copy to:-**

Shri Anurag Chhaganlal Gaud,
13, Deogiri Colony, Anuragvatika,
Kranti Chowk Police Station Road,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२०८/२००९/४२**

**तक्रार दाखल दिनांक :- २०/०४/२००९**
**निकाल दिनांक :- १९/०६/२००९**

**श्री अनुराग छगनलाल गौड,**
**१३ देवगीरी कॉलनी 'अनुराग वाटीका',**
**क्रांतिचौक पोलीस स्टेशन रोड,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११६०७९०७) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २०/०४/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०५/०५/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने वाणीज्य वापरासाठी महावितरण वीज कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला आहे. त्यांनी जुलै २००८ मध्ये वीज बिल भरल्यानंतर वीज पुरवठा कायमस्वरुपी बंद करुन डिपॉजिट रक्कम पुन्हा देण्याबाबत अर्ज दाखल केला. पण त्यांच्या अर्जाची कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याचे त्याचे म्हणणे आहे. महावितरण कंपनीकडुन वीज वापर नसतांना आदांजे वीज बिल आकारणी करण्यात आल्याचे व ते न भरल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्याचे त्यांनी आपल्या तक्रारीत पुढे म्हटले आहे.महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल आकारुन डिपॉजीट व त्यांनी अतिरिक्त भरलेली रक्कम परत करण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक ०५/०५/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री गौड तसेच महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी या प्रकरणाची कागदपत्रे छावणी उपविभागान उपलब्ध करुन न दिल्याचे कारण सांगत जवाब दाखल करण्यास मुदतवाढ मागितली मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करुन पुढील सुनावणी दिनांक ०८/०५/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०८/०५/२००९ रोजी अर्जदार उपस्थित होते. नोडल अधिकारी उपस्थित नव्हते.त्यांनी पुन्हा एकदा तारीख वाढवुन देण्याचे पत्र मंचात दाखल केले. छावणी उपविभागाचे श्री वाघ यांनी या प्रकरणी कागदपत्रे दाखल

करण्याची परवानगी मागितली मंचाने ती मान्य करुन त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्राची प्रत अर्जदारास देण्यात आली व त्यांना याबाबतीत त्यांचे म्हणणे पुढील सुनावणीच्यावेळी मांडण्याचे सांगण्यात आले. मंचाने या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक १२/०५/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक १२/०५/२००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. अर्जदारास चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात आली असल्याचे त्यांनी मान्य केले व अर्जदारास ८७६०=९९ रुपयाचे क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली. अर्जदाराने त्याने फेब्रुवारी २००४ मध्ये भरलेली १४२५/रुपये रक्कमेचा यात समाविष्ठ करण्यात आला नसल्याचे सांगितले व बिल रिव्हीजन प्रस्ताव मान्य नसल्याचे सांगितले. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

५) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरुन असे आढळुन येते की, अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन वाणीज्य वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांना देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९००११६०७९०७ असा आहे.नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या सि.पी.एल.चे अवलोकन केल्यावर असे आढळुन येते की अर्जदाराचे मीटर वीज वापराची योग्य नोंद घेत असतांना देखील महावितरण तर्फे त्यांना फॉल्टी व लॉक स्टेटस दाखवुन सतत चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात आली आहे. डिसेंबर २००३ ते मार्च २००८ या काळात अर्जदाराचा वीज वापर हा १०४ युनीट असतांना त्यांना २४३८ युनीट वीज वापराचे बिल आकारण्यात आल्याचे नोडल अधिकारी यांनी मान्य केले आहे. सि.पी.एल.चे निरीक्षण केल्यावर अर्जदाराने वरील काळात २५९४९/- रुपये रक्कम वीज बिलापोटी भरलेली असल्याचे दिसुन येते. अर्जदाराचा एकुन १०४ युनीट वीज वापरानुसार त्यांना वरील काळासाठी वीज बिल आकारणी करुन त्यांनी भरलेली अतिरिक्त रक्कम व सुरक्षा ठेव परत करणे अपेक्षित होते. पण गैर

अर्जदार यांनी अर्जदाराच्या तक्रारीची कोणतीही दखल घेतलेली दिसुन येत नाही. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास ८७६०=९९ रुपये परत करण्याबाबत तयार केलेला प्रस्ताव चुकीचा असल्याचे मंचाचे मत आहे.वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर अर्जदाराने मंचात दाखल केलेली तक्रार योग्य असल्याचे दिसुन येते. मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास डिसेंबर २००३ ते मार्च २००८ या काळासाठी १०४ युनीट वीज वापराचे बिल विभागुन सुधारीत वीज बिल तयार करावे व या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

२) अर्जदाराने कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत करण्याची मागणी केलेली असल्यामुळे अर्जदाराने वरील काळात भरलेली एकुण रक्कम २५९४९/-रुपये पैकी १०४ युनीटचे विभागुन दिलेले बिल वजा करुन अतिरिक्त रक्कम चेक द्वारे ३० दिवसांत व्याजासहीत परत करावी.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास दिलेल्या सेवेतील त्रुटीबाबत रुपये २५०/- ३० दिवसाच्या आत द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.
गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२०८/२००९/४२ दिनांक :-

**प्रति,**

श्री अनुराग छगनलाल गौड,
१३ देवगीरी कॉलनी 'अनुराग वाटीका',
क्रांतिचौक पोलीस स्टेशन रोड,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११६०७९०७)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२०८/२००९/४२ )

आपण दिनांक २०/०४/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती, सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.